दिनांक : ०५.०३.२०२६.

नि.फौ.ख.क्र. १०४/२०२३
सरकार ..वि.. प्रमोद चक्रे + १
निशाणी क्रमांक १८

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक २ ची जबानी** –

**मी शपथेवर सांगतो की,**

**नाव** :– **अनिल भानुदास खडसे** (घटनास्थळ पंच)

**वय** :– ३५ वर्षे,

**व्यवसाय** :– मजुरी,

**राहणार** :– शेंदोळा खुर्द, ता. तिवसा, जि. अमरावती.

……………………………………………………………………………………

**सरकार तर्फे सहायक सरकारी विधीज्ञ कु. एल.टी. गेडाम यांचे मार्फत शपथेवर सुरु** :-

मी आरोपीला ओळखतो. दिनांक १६.०७.२०२३ रोजी पोलीसांनी मला काठेही बोलविले नव्हते. माझ्या समक्ष पोलीसांनी कोणतीही घटनास्थळाची कार्यवाही केली नव्हती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे परंतु त्यातील मजकुर मला माहीत नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहायक सरकारी विधीज्ञ यांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १५४ नुसार परवानगी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६.०७.२०२३ रोजी पोलीसांनी मला फिर्यादीच्या घराजवळ शेंदोळा खुर्द येथे बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी दुसरा पंच उमेश जुनघरे हे माझ्यासोबत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मला घटनास्थळ दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करुन मला वाचुन दाखविल्यावर मी त्यावर सही केली होती. माझ्या

बयाणातील **<u>अधोरेखांकीत भाग-अ</u>** मला वाचुन दाखविण्यात आला. सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या बयाणात का लिहीला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास – संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. पी. गाडे यांचे मार्फत</u>** :-

३. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी अलका चक्रे ही माझी बहिण आहे.

**<u>उलटतपास – संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **समक्ष**

स्वा/–
**(रोहीणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती

स्वा/–
**(रोहीणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती